(३)

१

बुधवार दिनांक ५ एप्रिल १९९५ रोजी झालेल्या मंडळाच्या ३१ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ३१ वी बैठक बुधवार दिनांक ५ एप्रिल १९९५ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१] श्री. मनोहर विठोबा कोकाटे,	सभापती.
२] श्री. अशोक लाल,	उपसभापती तथा मुख्य अधिकारी.
३] श्री. सुनील कर्वे,	सदस्य.
४] श्री. हेमंत मंडलिक,	-"-
५] श्री. रविंद्र कोटकर,	-"-
६] श्री. मोहन देसाई,	-"-
७] डॉ. सौ. माला पाटील,	सदस्या.
८] श्री. चेतन शहा,	सदस्य.
९] श्रीमती सरोज कपाडिया,	सदस्या.
१०] श्री. गजेन्द्र लष्करी,	सदस्य.
११] श्री. उमाशंकर ओझा,	-"-
१२] श्री. कृष्णा गेनू कांबळे,	-"-
१३] श्री. अब्दुल रौफ पटेल,	-"-
१४] प्रमुख अभियंता, म. न. पा. ह्यांचे प्रतिनिधी.	निमंत्रक.

खालील मान्यवर उपस्थित नव्हते.

१] श्री. रॉकी फ्रास्टो,	सदस्य.
२] श्री. राजा चव्हाण,	-"-
३] श्री. बाळकृष्ण धुमाळे,	-"-
४] उपकर संचालक व निर्धारक, म. न. पा.	निमंत्रक.
५] श्री. यादवराव कांबळे,	उपसचिव, महाराष्ट्र शासन गृ. नि. व वि. स. विभाग, मंत्रालय.

उपसभापती व मुख्य अधिकारी श्री. अशोक लाल यांनी मा. सदस्य व उपस्थित अधिकारी यांचे स्वागत करून मा. सभापती यांचे अनुमतीने औपचारिक-रित्या कामकाजास सुरूवात केली.

बाब क्रमांक :- ३१. १
=========

विषय :- दिनांक १६. ३. ९५ रोजी झालेल्या अर्थसंकल्पिय बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करणेबाबत.

दिनांक १६. ३. ९५ रोजी झालेल्या अर्थसंकल्पिय बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करण्याबाबत पृष्ठ क्र. १ ते ४९ वर सादर करण्यांत आला आहे, असे मुख्य अधिकारी, दुवपु यांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांना सांगितले.

सदर कार्यवृत्तान्तावर चर्चा होवून सर्वानुमते सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक :- ३१. २
=========

अनुपालन अहवाल.

अ) मु. इ. दु. व पु. मंडळाची संक्रमण शिबिरे पुनर्रचित करून अतिरिक्त निधी उभा करणेबाबत.

सदर विषयाबाबत मागील बैठकीमध्ये मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी उपस्थित केलेल्या सुचनेनुसार सद्य:स्थितीबाबतचा सविस्तर अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ५१ ते ५९ वर सादर करण्यांत आला आहे. सदर अनुपालन अहवालावर चर्चा करताना मुख्य अधिकारी/दुवपु. यांनी सांगितले की, दुरूस्ती मंडळाकडे अतिरिक्त निधी उभा करण्यासाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत त्यांनी सुचविले की, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील विविध भागातील म्हणजेच मुंबई बेटावरील व उपनगरातील असलेल्या संक्रमण शिबिराच्या जागी जेथे पूर्णपणे चटई क्षेत्र निर्देशांक वापरलेलो नाही तेथे तो वापरून बहुमजली इमारती बांधून काही सदनिका

संक्रमण शिबिरासाठी राखून बाकी सदनिका बाजारभावाने विकल्यास त्यातून निधी उभा राहू शकतो. मुंबई इमारत दुरुस्ती मंडळात ३४ ठिकाणी एकूण ४८ संक्रमण शिबिरे असून त्यात सुमारे २१००० सदनिका आहेत. या संक्रमण शिबिरांची पुनर्बांधणी करणे आता आवश्यक झाले आहे. कारण जुन्या बांधकामाची कालमर्यादाही साधारण १५ वर्षे ते २०वर्षे होती जी आता पूर्ण झालेली आहे. या सर्व संक्रमण शिबिरांची पुनर्बांधणी करण्यासाठी जवळ जवळ २०० कोटी रूपयाची आवश्यकता भासणार आहे. तसेच अजूनही संक्रमण शिबिराची आवश्यकता भासणार आहे. कारण मध्यंतरी शासनाने एस.आर.डी.साठी १००० सदनिका संक्रमण शिबिरासाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच मुंबई बेटावरील घरमालक त्यांच्या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठीही संक्रमण शिबिराची मागणी करत आहेत. त्यामुळे सर्व संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी करण्याचे ठरविल्यास सुमारे २०० कोटीची गरज आहे व ती गरज शासनाकडून किंवा वित्तसंस्थांकडून मिळणे शक्य वाटत नाही, यासाठी मुंबई दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारित असलेल्या मोक्याच्या जागी असलेली संक्रमण शिबिरे जसे कुलाबा, बांद्रा पूर्व व पश्चिम, ओशिवरा, सायन प्रतिक्षानगर येथील संक्रमण शिबिरांच्या जागी पुनर्बांधणी करुन अतिरिक्त सदनिका बाजारभावाने/ठरविलेल्या किंमतीत विकून निधी उभा होऊ शकतो. त्यांनी पुढे सांगितले की, प्रतिक्षानगर सायनमध्ये होणाऱ्या नविन पुनर्बांधणीसाठी महानगरपालिकेने शासनाच्या अनुमतीने मुंबई दुरुस्ती मंडळास चटईक्षेत्र निर्देशांक २.१० प्रदान केला आहे. तसेच दुरुस्ती मंडळाला आपल्या पुनर्बांधणी कार्यक्रमासाठी चटईक्षेत्र निर्देशांक ३.१९२ देय आहे. म्हणजेच संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी हाती घेतलीतर मुंबई दुरुस्ती मंडळास किमान २०% अधिक चटईक्षेत्र नक्कीच उपलब्ध होणार आहे व शासनाशी विचारविनिमय करुन कदाचित ३.१९२ पर्यन्त चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध होऊ शकतो. या सर्व गोष्टींचा विचार करुन मुंबई मंडळाच्या वास्तुशास्त्रज्ञ श्रीमती मंडलेकर यांनी दुरुस्ती मंडळाच्या सर्व संक्रमण शिबिरांच्या पुनर्बांधणीच्या दृष्टीने सखोल अभ्यास करुन एक परीपूर्ण अहवाल तयार केला आहे, जो सोबत जोडला आहे. त्यात त्यांनी दोन तीन पर्याय सूचविले आहेत. तसेच प्रचलित पध्दतीने म्हणजे १.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरला तरी जवळ जवळ ४०,००० सदनिका उपलब्ध होतील. तसेच २.५० चटईक्षेत्र निर्देशांक वापरला तर ७४,००० सदनिका उपलब्ध होऊ

....४/...

६२८

७

शकतात आणि ३. १९२ चटई क्षेत्र निर्देशांक वापरला तर ८१,००० सदनिका उपलब्ध होऊ शकतात.

संक्रमण शिबिराच्या पुनर्बांधणीसाठी निधी उभारण्याच्या विषयावर पर्याय सुचविताना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी ///// सांगितले की, उपनगरातील जसे गोरेगाव येथील संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी योजना हाती घेतल्यास सदर संक्रमण शिबिराच्या जागी बहूमजली इमारती बांधून ज्या अतिरिक्त सदनिका उपलब्ध होणार आहेत त्या प्रचलित भावाने विकून त्यातून उपलब्ध होणा-या निधीतून संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी करता येईल हा एक पर्याय. दुसरा पर्याय सुचविताना त्यांनी सांगितले की, जर मुंबई दुरुस्ती मंडळाच्या कुलाबा, बांद्रा पूर्व व पश्चिम, अंधेरी या चार संक्रमण शिबिराच्या जागी उच्च उत्पन्न गटांतर्गत सदनिका बांधून त्या बाजारभावाने विकल्यास त्यातून उपलब्ध होणा-या निधीतून इतरत्र सर्व संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी होऊ शकते व दुरुस्ती मंडळासाठी ठराविक अतिरिक्त निधी सुध्दा उपलब्ध होऊ शकतो. परंतु असे करतेवेळी राजकिय दृष्टीकोन व सामाजिक हीत लक्षात घ्यावे लागेल. परंतू जर सदर पुनर्बांधणी योजनेतून पूर्वीच्या संक्रमण शिबिराच्या सदनिका तशाच ठेवून उर्वरित सदनिका बाजारभावाने विकल्यास पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकतो व लोकांचेही हीत जपले जाईल.

तरी सर्व सन्मा. सदस्यांना त्यांनी विनंती केली की, सदर बाबत विचार करून मार्गदर्शन करावे, म्हणजे त्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करता येईल.

वरील विषयावर सन्मा. सदस्य सर्वश्री सुनील कर्वे, उमाशंकर ओझा, चेतन शहा, पोतदार (म.न.पा. प्रतिनिधी), गजेंद्र लष्करी, रविंद्र कोटकर व इतर यांनी प्रदिर्घ चर्चा केली. सदर चर्चेच्या अनुषंगाने बोलताना मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी सुचविले की, मुंबई बेटातील जे सुमारे २०० भूखंड ज्याचा विविध कारणामुळे पुनर्विकास करणे शक्य नाही व जे आज मंडळाच्या ताब्यात आहेत व त्या भुखंडावरील भाडेकरू/रहिवाशांना दुरुस्ती मंडळाने संक्रमण शिबिराने पर्यायी जागा दिलेली आहे व ती एक प्रकारची मंडळावर जबाबदारी आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर काही भूखंड आरक्षणामुळे विकसीत करता येत नाहीत तर असे भूखंड महानगरपालिकेला हस्तांतरीत करून त्यावरील चटईक्षेत्र निर्देशांक टी.डी.आर. अंतर्गत उपनगरात वापरता येईल व अशा प्रकारे सर्व टी.डी.आर. एकत्र करून जर तो बांद्रा सारख्या

भागात वापरल्यास व भाडेकरूंना/रहिवाशांना मालकीतत्वावर घेण्यास प्रवृत्त केल्यास एकप्रकारे दुरूस्ती मंडळावरील जबाबदारी कमी होईल. तरी ह्या गोष्टींचाही विचार व्हावा, तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, संक्रमण शिबिराच्या भूखंडावर ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांक घेवून तेथील पुनर्बांधणी केलेल्या सदनिका पूर्वी संक्रमण शिबिरासाठी वापरण्यात आलेल्या सदनिकांची संख्या वजती करून उर्वरित अतिरिक्त सदनिका बाजारभावाने विकणे शक्य नाही. कारण महानगरपालिका यास परवानगी देणार नाही; कारण ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांक फक्त जुन्या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी अनुज्ञेय आहे. त्यांनी पुढे असे सुचविले की, ह्या ऐवजी मुंबई बेटावर जसे वडाळा, सायन प्रतिक्षानगर, अॅन्टॉपहील इ. ठिकाणी पूर्णपणे फक्त संक्रमण शिबिरासाठी ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांकाची यू.डी./महानगरपालिकेला विनंती केल्यास ती मान्य करणे शक्य आहे. तसेच उपनगरातील इतर संक्रमण शिबिरातील भाडेकरू/रहिवाशांना मुंबईत हलविणे सहज शक्य आहे व ते तयार होतील व तेथील संक्रमण शिबिराच्या जागी जो नियमाप्रमाणे अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक असेल तो वापरून बहूमजली इमारती बांधणे व त्या बाजारभावाने विकणे यामध्ये कोणतीही कायदेशीर बाब येईल असे वाटत नाही.

यावर चर्चा करतांना मा. सदस्य श्री. उमाशंकर ओझा यांनी असे प्रतिपादन केले की, ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांक हा शासनाने जून्या इमारतीतील रहिवाश्यांच्या कमी क्षेत्रफळाच्या जागेऐवजी कमीत कमी १८० चौ.फू.क्षेत्रफळ उपलब्ध व्हावे म्हणून दिला आहे. यावर मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, ज्या इमारतीचा पूर्वी वापरण्यात आलेला चटईक्षेत्र निर्देशांक ३.१९२ पेक्षा जास्त आहे त्याचाही विचार केलेला आहे. मा. सदस्य श्री. उमाशंकर ओझा यांनी पुढे सांगितले की, शासनाने जो ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांक दुरूस्ती मंडळाला दिला आहे त्याचा वापर करून बांधण्यात आलेल्या सदनिका खुल्या बाजारभावाने विकणे शक्य नाही.

यावर बोलताना मा. सभापती यांनी सांगितले की, मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी सूचविल्याप्रमाणे कुलाबा येथील संक्रमण शिबिराच्या जागी जेवढया सदनिका संक्रमण शिबिरासाठी वापरण्यात येत आहेत तेवढयाची पुनर्बांधणी दुरूस्ती मंडळामार्फत करावी व उर्वरित जागा मुंबई मंडळाला हस्तांतरीत करावी, जेणे करून मुंबई मंडळ तेथे उच्च उत्पन्न गटांतर्गत सदनिका बांधून विकू शकते व

...६/...

त्याचा फायदा साहजिक दुरुस्ती मंडळास निधी उपलब्धतेसाठी होईल. यावर मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी मुद्दा उपस्थित केला की, मुंबई मंडळच का? खाजगी दुरुस्ती मंडळामार्फत का नाही? यावर खुलासा करताना मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी प्रतिपादन केले की, दुरुस्ती मंडळाला नविन सदनिका बांधून विकणे शक्य नाही. तसेच मुंबई मंडळ व दुरुस्ती मंडळ हे प्राधिकरणाचे घटक असल्यामुळे कायदेशीर अडचणी येण्याची शक्यता कमी आहे.

यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी असेही सुचविले की, मुंबई मंडळाकडून फंड घेवून दुरुस्ती मंडळ मुंबई बेटावरील संक्रमण शिबिरांच्या जागांवर संक्रमण शिबिरांसाठी नविन पुनर्बांधणी करेल व उपनगरातील संक्रमण शिबिरांच्या जागा मुंबई मंडळ हस्तांतरीत करून त्यावरील अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाचा लाभ घेवून नविन बहुमजली इमारती बांधील व त्या खुल्या बाजारात विकून व बांधकाम खर्च काढून जो नफा होईल त्यातील ठराविक रक्कम दुरुस्ती मंडळाला दिलेल्या फंडापोटी कपाती केली जाईल. त्यामुळे दुरुस्ती मंडळास निधीचीही कमतरता भासणार नाही.

यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. उमाशंकर ओझा यांनी असे प्रतिपादन केले की, मुंबई मंडळाला जर दुरुस्ती मंडळाची जमीन हस्तांतरीत करावयाची असल्यास त्यापूर्वी मुंबई मंडळ दुरुस्ती मंडळास किती नफा देणार, बांधकाम खर्च किती होणार इ. बाबी स्पष्ट करणे जरूरीचे आहे.

वरील विषयांवर चर्चा करताना मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी व मा. सदस्या श्रीमती सरोज कपाडीया यांनी अशी विनन्ती केली की, कुलाबा विभाग हा अत्यंत गर्दीचा झालेला आहे व दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे व त्यात जर नविन इमारतींची/लोकांची भर पडली तर तेथील नागरी सुविधांवर ताण पडेल, तसेच स्थानिक लोक सदर योजनेस प्रतीकार करण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, मुंबई बेटावरील संक्रमण शिबिराच्या जागावर यू.डी. खात्याला विनन्ती करून ३. १९२ चटई क्षेत्र निर्देशांकाचा लाभ घेवून संक्रमण शिबिर दुरुस्ती मंडळ बांधेल व त्यासाठी लागणारा निधी मुंबई मंडळ दुरुस्ती मंडळाला देईल अशी अपेक्षा आहे व त्यापोटी दुरुस्ती मंडळ उपनगरातील संक्रमण शिबिराची जागा मुंबई मंडळाला हस्तांतरीत करेल व त्यावर मुंबई मंडळ उच्च उत्पन्न गटांतर्गत किंवा त्यांना योग्य वाटेल

...७/...

अशा योजनांतर्गत बांधकाम करेल. तसेच दुरुस्ती मंडळातर्फे जी संक्रमण शिबिरे बांधण्यात येणार आहेत त्याचे कमीत कमी क्षेत्रफळ २५० चौ. फू. असेल व चांगल्या सुविधा शक्यतोवर पुरवाव्यात. तसेच यापुढे प्रतिक्षा नगराची संक्रमण शिबिराच्या दृष्टीने सर्वोतोपरी योजनामध्ये कार्यक्रम आखला जाईल. तसेच काही इमारती बृहत्सूचीवरील रहिवाशी/भाडेकरू मालकी तत्वाने घेण्यास पुढे आल्यास वरिष्ठ पातळीवर मंजूरी घेवून त्या त्यांना देण्यांत येतील.

चर्चेच्या ओघाओघात मा. सभापती श्री. मनोहर विठोबा कोकाटे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मागील २/४ बैठकीमध्ये संक्रमण शिबिरामधील घुसखोरीबाबत कडक धोरण अवलंबविण्याचे ठरले होते. या बाबत त्यांनी मुख्य अधिकारी, दुवपु यांना विनंती केली की दुरुस्ती मंडळाच्या विविध संक्रमण शिबिरामध्ये जी दोन हजारापरती घुसखोरी झालेली आहे, त्याच्यावर त्वरित कार्यवाही करण्याबाबत काय उपाययोजना करण्यांत येत आहे. यावर मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, घुसखोरीबाबत मंडळ वेळोवेळी निष्कासन करण्याची कार्यवाही करीत असते, परंतु काही वेळा राजकीय हस्तक्षेप होत असल्यामुळे तसेच न्यायालयीन प्रकरणे असल्यामुळे त्यात अडथळे निर्माण होतात. यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी सांगितले की, मागे एका संक्रमण शिबिरामधील घुसखोरांना निष्कासन करण्याच्या कार्यवाहीच्या वेळी ते स्वत: उपस्थित होते त्यावेळी त्यांच्या असे निदर्शनास आले की, मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने घुसखोरीचे निष्कासन करून झाल्यावर काही तासात परत घुसखोर त्या गाळ्याचा ताबा घेतात. तसेच मंडळाच्या अधिकाऱ्यांनाही ते धमकावणी देत असतात. [illegible] त्यामुळे मंडळाचे अधिकारी हे तेथेच कार्यरत असल्यामुळे त्यांनाही त्या गोष्टीचा मानसीक त्रास सहन करावा लागतो.

याच अनुषंगाने बोलताना मा. सदस्य श्री. रौफ पटेल यांनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांच्या माहितीतील ओशिवरा संक्रमण शिबिरामध्ये अजुनही घुसखोर आहेत. परंतू त्याची नोंद घुसखोरीच्या तक्त्यात घेतलेली नाही. व याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

....८/...

क] इ. क्र. ६२५, जे. एस. एस. मार्ग, सी-३
सी-४ विभाग.

वरील विषयाबाबतचा अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ८१ ते ८५ वर सादर करण्यांत आलेला आहे. मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, मागिल बैठकीमध्ये मा. सदस्य श्री. सुनिल कर्दे यांनी सदर बाबत विचारणा केली होती. त्यांनी सांगितले की, सदर इमारतीच्या दुरूस्तीसाठी "ना हरकत प्रमाणपत्रं" [विना परतावा] सन १९८५ मध्ये मंडळामार्फत प्रदान करण्यांत आले होते. त्यानंतर १९९४ पर्यन्त त्याबर काहीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही व सध:स्थितीमध्येमहानगरपालिकेकडून नकाशे मंजूर करून संबंधित ना हरकत प्रमाणपत्र-धारकाने त्या इमारतीच्या दुरूस्तीचे काम सुरु केले. याबाबत संबंधित कार्यकारी अभियन्ता यांनी स्थगिती नोटीस दिली होती. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, संबंधित ना हरकत प्रमाणपत्रधारक किंवा त्यांचे वास्तुशास्त्रज्ञ यांनी प्रस्तावित दुरूस्तीच्या कामाच्या नकाशाची एक प्रत तसेच सन १९८५ मध्ये दिलेले "ना हरकत प्रमाणपत्र" [विना परतावा] नुतनीकरण करूण्याबाबतचा अर्ज संबंधित कार्यकारी अभियन्ता, सी-३/सी-४ विभाग यांना तात्काळ सादर करावा व संबंधित कार्यकारी अभियन्ता यांनी त्यावर योग्य ती कार्यवाही त्वरित करावी.

पूर्तता
[का]र्यकारी
[अभि]यंता,
[सी]-३/सी-४.

ड] पुनर्रचित इमारतीतील गाळयांचा सेवाआकार वाढविण्याबाबत.

सदर अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ८७ वर ठेवण्यांत आला आहे. सदर बाबतची माहिती मुख्य अधिकारी, दुवपु यांनी उपस्थितांना दिली. सविस्तर चर्चेअंती पुनर्रचित इमारतीतील गाळयाच्या सेवाशुल्कात पाच रूपये वाढ मंडळाच्या दिनांक ३. ३. १९९३ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार करण्यांत आली. त्याची उपस्थितांनी नोंद घेऊन त्यास मान्यता दिली.

इ] इ. क्र. १५१-१५३, ताहेरी मंझील
डिमटिमकर मार्ग, नागपाडा, मुंबई.

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ८७-अ ते ८७-ब वर सादर करण्यांत आलेली आहे. वरील विषयाबाबतची सविस्तर माहिती उपमुख्य अभियन्ता [उत्तर] यांनी उपस्थितांना दिली. सविस्तर चर्चेअंती सदर इमारतीच्या तात्पुरत्या दुरुस्तीस "ना हरकत प्रमाणपत्राद्वारे" विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक :- ३१/२१८

इमारत क्र. १५१-१५३ ताहेरी मंझील, डिमटिमकर मार्ग, नागपाडा ई-१ विभागातील इमारतीच्या तात्पुरत्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे विना अनुदान तत्वावर नियमानुसार परवानगी देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक :- ३१.३

उपमुख्य अधिकारी [सं. गा.] याचे प्रस्ताव
अ] महर्षि शंकरराव मोहिते पाटील शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोहिते पाटील विद्यालयात मानखुर्द संक्रमण शिबिरात गाळे पिळणेबाबत.

वरील प्रस्ताव पृष्ठ क्रमांक ८९ ते ९३ वर सादर करण्यांत आलेला आहे. मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, सचिव, महर्षि शंकरराव मोहिते-पाटील शिक्षण प्रसारक मंडळ, मानखुर्द मुंबई यांनी दिनांक १६. १. ९५ च्या पत्रान्वये मा. सभापती, दुवपु यांना विनन्ती केली की, मानखुर्द येथील एकूण ४ ईमारतीमधील इ. क्र. १ मध्ये १६ गाळे सन १९९० पासून रिक्त आहेत. तरी ते गाळे त्यांच्या संस्थेस भाडे तत्वावर देण्यांत यावेत. त्यांनी पुढे असेही सांगितले की, उपमुख्य अधिकारी [सं. गा.] यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मानखुर्द मुंबई या संक्रमण शिबिरात एकूण १९२ गाळे आहेत, त्यापैकी ९७ गाळे

....१२/...

सध्या रिक्त आहेत. त्यांनी पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, सदर संस्था त्यांचे वर्ग तेथील मारुती मंदीरासमोरील पटांगणात तात्पूरत्या शेडस् उभारुन तसेच इतरत्र खोल्या घेवून भरवित आहे. तरी सदर संस्थेस संक्रमण शिबिरातील खोल्या भाडे तत्वावर द्यावयाच्या झाल्यात त्याची पूर्व संमती प्राधिकरणाकडून घ्यावी लागेल, कारण संक्रमण शिबिरातील गाळे हे जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतीतील बेघर रहिवाशी/भाडेकरुंसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून वापरले जातात. तरी उपस्थितांच्या मान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

सदर प्रस्तावावर उपस्थित सर्व मान्यवर सदस्यांनी चर्चा करुन सर्वानुमते सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत सविस्तर अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे ठरले.

ब] प्रतिक्षानगर सायन सं.शि.त "चाळ संघटना समन्वय महासंघास" बहुमजली इमारतीमधील १५ गाळे प्राथमिक शाळा, बालवाडी चालविण्यासाठी देण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. ९५ ते ९७ वर सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, "चाळ संघटना समन्वय महासंघ" प्रतिक्षानगर संक्रमण शिबिर सायन कोळीवाडा यांच्या पदाधिकाऱ्यांनी मा. सभापती, दुवपु यांचे दालनात दि. २५.११.९७ रोजी चर्चा करुन सायन संक्रमण शिबिर येथील विविध बैठ्या चाळीत देण्यांत आलेल्या १४ गाळयांबद्दल तेथील बहुमजली इ.क्र.६ मधील तळ मजल्यावरील १५ रिक्त गाळे प्राथमिक शाळा व बालवाडी वर्ग चालविण्यासाठी वितरीत करावेत अशी विनन्ती केली. त्यांच्या विनंतीस अनुसरुन सहमुख्य अधिकारी, दुवपु यांनी सविस्तर टिप्पणी सन्मा. सदस्यांच्या अवलोकनार्थ व मंजूरीसाठी आजच्या बैठकीत सादर करण्यांत आली आहे. सदर प्रस्तावास मंडळाची मंजूरी मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर करण्यांत येईल.

सविस्तर चर्चेअंती पृष्ठ क्र. ९६ आणि ९७ वर दिलेल्या १ ते ८ अटींच्या अधिन राहून सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

25

क] दहिसर सं. शि. त. पोलिस चौकीसाठी दोन गाळे मिळण्याची मागणी.

वरील प्रस्ताव पृष्ठ क्र. ९९ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, वरिष्ठ पोलिस निरिक्षक दहिसर पोलिस चौकी यांनी त्यांच्या दि. १७. ११. ९४ च्या पत्राद्वारे मंडळाकडे विनंती केली की, दहिसर संक्रमण शिबिर येथे पोलिस चौकीसाठी दोन गाळे वितरीत करावे, कारण सध्या त्यांच्याकडे पोलिस चौकीच्या कामकाजासाठी अस्तित्वात असलेले गाळे फारच अपुरे पडत आहेत. त्यांनी पुढे असेही सांगितले की, उपमुख्य अधिकारी [पु. गा.] यांनी सादर केलेल्या अहवालानुसार दहिसर [पूर्व] येथे ४०१ गाळयांचे संक्रमण शिबिर आहे आणि सध्या तेथे ३९ गाळे रिक्त आहेत. सदर संक्रमण शिबिरातील गाळे हे निवासी वापरासाठी असल्याने त्या व्यतिरिक्त वापरासाठी द्यायचे झाल्यास त्यासाठी प्राधिकरणाची मंजूरी घेणे क्रमप्राप्त ठरते. तरी सदर गाळे पृष्ठ क्र. ९९ वरील १ ते ७ अटींना अधिन राहून वितरीत करण्याचे प्रस्तावित केले आहे. सन्मा. सदस्यांनी सदर बाबत मंजूरी दिल्यास सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर करण्यांत येईल.

सदर प्रस्तावावर सर्व सन्मा. सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन दहिसर संक्रमण शिबिरातील २ गाळे पोलिस चौकीसाठी पृष्ठ क्र. ९९ वरील १ ते ७ अटींच्या अधिन राहून सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी मा. सभापतींच्या अनुमतीने डोअर स्टेप या शैक्षणिक संस्थेसाठी दोन सदनिका दुरुस्ती मंडळाच्या कफ परेड येथील संक्रमण शिबिरातून देण्याची विनंती केली. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारितील जी संक्रमण शिबिरे आहेत ती निवासी वापरासाठी असून मुंबई बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीतील बेघर रहिवाशी/भाडेकरुंना पर्यायी व्यवस्था म्हणून वितरीत केली जातात. जर सदर गाळे शैक्षणिक संस्थेसाठी द्यायचे ठरल्यास प्राधिकरणाची मंजूरी घेणे क्रमप्राप्त ठरते.

यावर सर्व सन्मा. सदस्यांनी चर्चा करुन डोअर स्टेप या शैक्षणिक संस्थेस कफ परेड सं. शि. तील दोन सदनिका मंडळात योग्य वाटतील अशा अटींच्या अधिन राहून वितरीत करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक :- ३१/ २१९

अ] महर्षि शंकरराव मोहिते पाटील शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोहिते पाटील विद्यालयास मानखुर्द संक्रमण शिबिरात गाळे मिळणेबाबत.

ब] प्रतिक्षानगर सायन सं. शि. त "गाळे संघटना समन्वय महासंघास" बहुमजली इमारतीमधील १५ गाळे प्राथमिक शाळा, बालवाडी चालविण्यासाठी देण्याबाबत.

क] वडाळा सं. शि. त मोलिस चौकीसाठी दोन गाळे पोलीस खात्यास वितरीत करण्याबाबत.

ड] डोअर स्टेप या शैक्षणिक संस्थेसाठी दोन सदनिका दुरुस्ती मंडळाच्या कफ परेड येथील संक्रमण शिबिरातून देण्याबाबत.

वरील सर्व प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक :- ३१.४

विषय :- पुनर्रचना विभागातील प्रस्तावांना प्रशासकीय तथा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव.

अ] शीव कोळीवाडा येथील कॅम्प नं. २ संक्रमण शिबिराचा पुनर्विकास करणे.

ब] शीव कोळीवाडा येथील संक्रमण शिबिर पुनर्विकास करणे [चरण - २] या योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

उपरोक्त विषयासंबंधीची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १०१ ते १२७ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावांवर चर्चा करताना मुख्य अधिकारी, दुपगु यांनी उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] श्री. शहा यांना सदरबाबतची माहिती उपस्थितांना देण्याबद्दल सांगितले.

उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] यांनी सांगितले की, सदर प्रस्ताव हे संक्रमण शिबिरांच्या पुनर्बांधणीसाठी सुधारीत प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत सादर करण्यांत आलेले आहे. सदर प्रस्तावाची विस्तृत माहिती देताना त्यांनी सांगितले की, शीव कोळीवाडा येथील संक्रमण शिबिर क्रमांक २ च्या गाळ्यांचे बांधकाम सन १९७१-७२ मध्ये करण्यांत आले होते व त्यांची आयुमर्यादा पूर्ण झाली असून त्यांच्या देखभालीसाठी वरच्यावर तक्रारी येत असतात. तरी सदर गाळे तोडून त्या जागी नविन संक्रमण शिबिरे बांधण्याचे ठरले होते. पूर्वी सदरहू योजना ३ टप्प्यामध्ये राबविण्याचे ठरले. त्याप्रमाणे प्रथम टप्प्यामध्ये ९४८ गाळ्यांचे बांधकाम हाती घेण्याचे ठरले. सदर योजनेस प्राधिकरणाने दिनांक २८.५.८६ द्वारे ५,३१,८२,०००/- च्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली. तदनुसार एकूण १२ इमारतींचे काम टप्प्या टप्प्याने प्रस्तावित करण्यांत आले होते. त्यापैकी सध्या ५ इमारतींचे काम पूर्ण झालेले आहे. सन १९८६ मध्ये सदर योजना एकाचवेळी राबविण्यात येणार होती, परन्तू संक्रमण शिबिरातील गाळे रिकामे न मिळाल्यामुळे व भाडेकरू/रहिवाशांनी सदर गाळे खाली करण्यास नकार दिल्यामुळे सदर योजना टप्प्या टप्प्याने करण्याचे ठरले. पहिल्या टप्प्यात ३ इमारती मिळून २३७ गाळे बांधण्यात आले व दुसऱ्या टप्प्यामध्ये २ इमारती मिळून १५८ गाळे बांधण्यांत आले. टप्पा क्रमांक ३ व ४ मध्ये एकूण ४ इमारतींचे बांधकाम हाती घेण्यांत येत असून सदर इमारतींच्या पायथ्याच्या कामाच्या निविदा बोलावण्यात आलेल्या आहेत. तसेच गेल्या ९ वर्षात एकूण बांधकामाच्या दरात प्रचंड वाढ झाली, तसेच ड्रेनेजसाठी बराच खर्च करावा लागेल त्यामुळे प्राथमिक रकमेत वाढ होत आहे. आणि त्यासाठी सुधारीत प्रशासकीय मंजूरी जरूरी आहे.

यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आजच्या बैठकी पुढे जो सुधारीत मान्यता देण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे त्यात जोत्याखालील कामास [पाईल फाऊंडेशन] व ज्योत्यावरील कामास लागणारे अपेक्षित खर्चाचा समावेश आहे. तर पूर्वी सदर योजनेस किती

835

37

रकमेची तरतूद केली होती. यावर बोलताना उपमुख्य अभियंता [पूर्व] यांनी सांगितले की, पूर्वी ६०.०० लक्ष रुपयाची तरतूद केली होती, परंतू गेल्या काही वर्षात बांधकाम साहित्याचे दर वाढल्याने तरतूदीमध्ये वाढ झाली आहे आणि त्यामुळे सुधारीत प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. यावर त्यांनी अशी विचारणा केली की जोत्यावरील बांधकामावर किती खर्च येईल. यावर खुलासा करताना उपमुख्य अभियंता [पूर्व] यांनी सांगितले की, सदर कामास अंदाजे ४ ते ५ कोटी खर्च अपेक्षित आहे. यावर बोलताना मा.सदस्य श्री. सुनील वर्दे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, ही सर्व योजना पूर्ण होण्यास अंदाजे ५ कोटीची जरूरी आहे. तसेच सदर योजनेतून संक्रमण शिबिरासाठी गाळे बांधण्याचे उद्दिष्ट आहे. परंतू आजच्या बैठकीत सादर केलेल्या संक्रमण शिबिरातील रिक्त व घुसखोर गाळ्यांची संख्या पहाता सुमारे ४३४३ गाळे [२१५६ रिक्त + २१८७ घुसखोर] आज दुरुस्ती मंडळाकडे आहेत आणि अशा परिस्थितीत अंदाजे ५ ते ६ करोड रुपयांचा निधी फक्त संक्रमण शिबिरासाठी खर्च करणे उचित योग्य आहे. कारण एकदा आपण सदर कामास सुधारीत प्रशासकीय मंजूरी दिल्यावर जोत्यावरील बांधकाम [work above plinth] करणे मंडळास अनिवार्य आहे, आणि म्हणून सदर प्रस्तावित योजनेतील सर्व इमारतींच्या जोत्याखालील बांधकाम जसे पाईल फाऊंडेशन काम हाती घेण्यापेक्षा मंडळाकडे जेवढ्या निधीची तरतूद आहे त्या हिशोबाने एका इमारतीचे जोत्याखालील बांधकाम व त्याच इमारतीचे जोत्यावरील बांधकाम करणे इष्ट ठरेल आणि असे करतेवेळी त्या कामाची आजच्या स्थितीत किती निकड आहे हे पाहणे तितकेच जरूरीचे आहे.

मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सदर बाब स्पष्ट करताना सांगितले की, संक्रमण शिबिराच्या पुनर्बांधणीसाठी सन १९९५-९६ च्या आर्थिक वर्षामध्ये ६०.०० लाखाची तरतूद केलेली आहे. आजच्या बैठकीमध्ये सदर ६०.०० लाखाच्या तरतूदीवर अधिक २५ लाख रुपये निधीची आवश्यकता आहे व त्यासाठी सुधारीत प्रशासकीय मंजूरी प्रस्तावित आहे. म्हणजे जोत्याखालील कामास जवळ जवळ ८५ लाख रुपये निधीची जरूरी आहे आणि हे काम पूर्ण झाल्यावर लगेच जोत्यावरील कामासाठी जवळ जवळ ६ कोटी निधीची आवश्यकता आहे आणि आजच्या स्थितीमध्ये फक्त सायन प्रतिक्षानगर संक्रमण शिबिरामध्ये ७११ सदनिका रिक्त आहेत, तसेच हा जो निधी आहे तो दुरुस्ती मंडळाला मिळणाऱ्या विविध मार्गातून उपलब्ध केला जातो. जर संक्रमण शिबिराच्या पुनर्बांधणीसाठी

६ कोटी वापरण्यात आले तर पुनर्बांधणीच्या इतर जरुरी कामांना खीळ बसेल. तसेच दुरुस्ती मंडळास नविन पुर्नरचित इमारती बांधून त्या खुल्या बाजारात विकून निधी उपलब्ध करणेही शक्य नाही. तरीही याबाबत जर शासनाने विशेष बाब म्हणून मालकीतत्त्वावर सदनिका बांधून त्या वितरीत करण्याची परवानगी दिल्यास यावर विचार करणे शक्य आहे.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते विषयांकित योजनेचा सुधारित प्रशासकिय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव ना मंजूर करण्यांत आला.

विषय :- इमारत क्र. १०बी, सी, डी, कुंभार चाळ, फितवाला रोड "ज" [दक्षिण] विभाग, मुंबई.

वरील कामाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १२९ ते १४१ वर सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांचेकडे विचारणा केला की, जोत्याखालील बांधकाम व जोत्यावरील बांधकाम हे एकाच ठेकेदाराला [एजन्सीला] का दिले जात नाही? यावर खुलासा करतांना उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सांगितले की, जोत्याखालील काम जसे पाईप फाऊंडेशन तसेच प्रीकास्ट पाईल फाऊंडेशन अशा प्रकारची खास कामे ही विशिष्ट ठेकेदारांकडूनच करुन घ्यावयाची असतात. म्हणून जोत्याखालील कामे व जोत्यावरील कामांसाठी वेगवेगळया ठेकेदारांची नियुक्ती केली जाते. यावर मुख्य अधिकारी, दुवपु यांनी असे प्रतिपादन केले की, जर असे असेल तर मुख्य कामाच्या करारनाम्यात जोत्याखालील [Below plinth work] खास कामे विशिष्ट ठेकेदारांकडूनच करुन घेण्याबाबतची अट घालण्यांत यावी. त्यामुळे वेळही वाचेल व काम लवकर पूर्ण करता येईल. त्यांनी पुढे असेही सांगितले की, दुरुस्ती मंडळामार्फत ज्या इमारती पुनर्रचित केल्या जातात, त्यांचे भूखंड सर्वसाधारणपणे लहान आकारमानाचे असतात. त्यामुळे सदर भूखंडावर एक किंवा दोन इमारती उभारण्यासाठी दोन दोन ठेकेदारांची नियुक्ती करणे हे कितपत योग्य आहे? यावर चर्चा करतांना मा. सदस्य श्री. उमा शंकर ओझा यांनी सांगितले की, जर एकाच कामासाठी, आणि त्या कामाची व्याप्ती लक्षात घेता दोन दोन ठेकेदारांची नियुक्ती केल्यास भविष्यांत जर त्या कामांमध्ये काही धोका उद्‌भवल्यास सदर दोन्ही ठेकेदार त्यांची जबाबदारी एकमेकावर ढकलतील. त्यामुळे त्यांनी असे मत प्रदर्शित केले की, जोत्याखालील बांधकाम व जोत्यावरील बांधकाम, मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितल्याप्रमाणे योग्य वाटतील अशा अटी घालून एकाच ठेकेदाराला देणे संयुक्तिक ठरले. व त्यास सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांनी मान्यता दर्शविली.

६ ६४०

 ३५

सविस्तर चर्चेअंती मुख्य अधिकारी/दुवपु यांनी उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांना असे सुचविले की, पुनर्बांधणीची जी कामे आज चालू स्थितीत आहेत. ती पुर्ण करण्यास किती निधी अपेक्षित आहे? तसेच जी कामे आज चालू होण्याच्या मार्गावर आहे त्यांना पुर्ण करण्यास किती निधी अपेक्षित आहे? याची तपशीलवार माहिती पुढील बैठकीत सादर करावी. तद्नंतर सदर प्रस्तावावर वि.ार केला जाईल.

ड] विषय :- जुनी इमारत क्र. १३१ सी, राजाराम निवास, दादासाहेब फाळके मार्ग, फ/दक्षिण विभाग, मुंबई येथील पुनर्बांधणी योजनेस सुधारित आर्थिक मंजूरी मिळणेबाबत....

वरील विषयाबाबतचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १४३ ते १४९ वर सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, सदर पुनर्बांधणी योजनेअंतर्गत भूखंडाचा ताबा जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडून दुरुस्ती मंडळास दि. १९.८.९४ रोजी मिळाला आहे. तसेच सदर योजनेचा सविस्तर नकाशा व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु असून सन १९९४-९५ दरसूचीप्रमाणे ५४००/- प्र. चौ.मी. या ढोबळ दराने रु. ३४.१९ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर रकमेच्या खर्चास मंडळाची सुधारित आर्थिक मंजूरी मिळणे क्रमप्राप्त असल्या-मुळे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी रु. ३४.१९ लक्ष एवढया रकमेस सुधारित आर्थिक मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

इ] विषय :- इमारत क्र. २८, परळ व्हिलेज, "फ/द" विभाग, "शापुरजी चाळ" या नांवाने ओळखल्या जाणा-या इमारतीची पुनर्बांधणी योजना.

उपरोक्त विषयाची सविस्तर टिप्पणी पृष्ठ क्र. १५१ ते १५९ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर विषयाबाबत माहिती देताना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी असे सांगितले की, पूर्वीच्या जुन्या इमारतीत एकूण ५ भाडेकरु असून पुर्नबांधणी केल्यावर १९ गाळे उपलब्ध होणार आहेत. पूर्वीच्या जुन्या भाडेकरुंना सामावून घेतल्यावर १४ अतिरिक्त गाळे मंडळास उपलब्ध झाले आहेत. सदर इमारतीच्या कामास प्रारंभी काही अडचणी निर्माण झाल्यामुळे तसेच जुन्या इमारतीतील भाडेकरुंनी

इमारत वेळेवर खाली न केल्यामुळे पोलिसांची मदत घेऊन इमारत खाली करण्यांत आली व तद्नंतर इमारतीचे काम करण्यांत आले. सदर इमारतीच्या मंजूरी नकाशांत इमारतीच्या सभोवताली भिंत नसल्यामुळे ही भिंत नंतर बांधण्यांत आली. इमारत पूर्ण होऊन महानगरपालिकेकडून निवासी वापर परवाना मिळाला आहे. सदर इमारतीवर झालेल्या वाढीव कामामुळे खर्चात वाढ झाली. सदर वाढ ही ११.१५% मूळ प्रशासकीय मान्यतेच्या वर असल्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली-नुसार त्यास पुन्हा सुधारित प्रशासकीय मंजूरी घेणे क्रमप्राप्त आहे. तरी सदर योजने-च्या रु. १२,८०,००० एवढया खर्चास मंडळाने मंजूरी देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या पुर्नबांधणीच्या योजनेस रुपये १२,८०,०००/- एवढया खर्चास पुन्हा सुधारित आर्थिक मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ई] विषय :- इमारत क्र. २०-२२ मुझावर पाखाडी रोड, माझगांव विभाग भूकर पाहणी क्र. २०३ व २०४ "ई" विभाग येथील पुनर्रचना योजनेस प्रशासकिय मान्यता मिळण्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी मागील बैठकीत ठेवण्यांत आली होती. मागील बैठकीमध्ये माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करुन सदर प्रस्ताव पुन्हा आजच्या बैठकीत पृष्ठ क्र. १६१ ते १६९ वर सादर करण्यांत आला आहे. विषयांकित जुन्या इमारतीमध्ये एकूण ३७ गाळेधारक असून नवीन इमारतींमध्ये फक्त २३ गाळे उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे एकंदर १४ गाळे मंडळास कमी उपलब्ध होणार आहेत. प्रस्तावित इमारतीतील प्रत्येक गाळा ६ स्वयंपुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामासाठी भूसंपादनासहीत अंदाजित खर्च रुपये २५ लाख अपेक्षित आहे. तरी सदर योजनेच्या रु. २५ लक्ष्य एवढया खर्चास [भूसंपादनासहीत] प्रशासकिय मान्यतेसाठी व २२ मुझावर पाखाडी रोड या इमारतीचा भूखंड म्हाडा अधिनियमातील कलम क्रमांक ९३[१] अन्वये संपादन करण्यास मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या २५ लक्ष्य एवढया खर्चास [भूसंपादनासहित] प्रशासकिय मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

६७२

३८

उ]   विषय :- इमारत क्र. ९ अे,बी,डी,ई.उमरखाडी, "ब" विभाग, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या योजनेच्या अंदाजपत्रकास सुधारित आर्थिक मंजूरी देणेबाबत...

वरील विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र.१७१ ते १७९ वर सादर करण्यांत आली आहे. सदर विषयाबाबत बोलताना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी असे सांगितले की, सदर योजनेसाठी सन १९८३ साली २३.७५ लाख रकमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली होती. विषयांकित मालमत्तेवरील इमारतीत पूर्वी ४६ भाडेकरू असून नवीन पुनर्रचित होणा-या इमारतीमध्ये ६२ सदनिका उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे मंडळास १६ अतिरिक्त सदनिका उपलब्ध होणार आहेत. सदर भूखंडाचा ताबा मंडळाला मिळाला असून पुनर्बांधणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. तरी सदर योजनेचा खर्च ५५.८० लक्ष रु.[भूसंपादनासहित] अपेक्षित असून त्यास सुधारित आर्थिक मंजूरी मिळणे जरूरीचे आहे. तरी सदर प्रस्ताव सन्माननीय सदस्यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत आला आहे.

वरील विषयावर सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते रु.५५.८० लक्ष [भूसंपादनासहीत] एवढया रकमेस सुधारित आर्थिक मंजूरी देण्याचे ठरले.

ऊ.]   विषय :- इमारत क्र.२५-२५ अे बोरभाट लेन "ड" विभाग इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकिय मंजूरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र.१८१ ते १८९ वर सादर करण्यांत आली आहे. सदर बाबत माहिती देताना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, जुन्या इमारतीतील भाडेकरूंची संख्या एकूण २२ असून नवीन इमारतीत ३५ निवासी गाळे उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे एकंदर १३ निवासी जादा गाळे उपलब्ध होणार आहेत. सदर योजनेस सन १९८८ मध्ये १७.२३ लाख रकमेस प्रशासकिय मान्यता देण्यांत आलेली होती. आता पुनर्रचित इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून महानगरपालिकेने सदर इमारतीस निवासी वापर परवाना दिलेला आहे. परंतु सदर पुनर्बांधणी योजनेची किंमत पूर्वीच्या प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जास्त होत असल्यामुळे सुधारित प्रशासकिय मान्यतेची आवश्यकता आहे. तरी सदर योजेनेच्या ३३.८६ [भूसंपादनासहित] दुरुस्ती मंडळास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

वरील प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा केल्यानंतर सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते सदर योजनेच्या ३३.८६ लक्ष [भूसंपादनासहित] हया रकमेस सुधारित प्रशासकिय मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ३१/२२०

सविस्तर चर्चेअंती पुनर्बांधणी विभागाच्या खालील सर्व प्रस्तावांना प्रशासकिय तथा सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली.

योजनेचे नांव	प्रशासकिय मंजूरी/सुधारक प्रशासकिय मंजूरी इत्यादी.
ड] जुनी इमारत क्र. १३१ ती, राजाराम निवास, दादासाहेब फाळके मार्ग, फ/दक्षिण विभाग, मुंबई येथील पुर्नबांधणी योजनेस सुधारित आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.	रु. ३४.१९ लाख
इ] इ.क्र. २८ परळ व्हिलेज, "फ/द" विभाग "शापुरजी चाळ" या नांवाने ओळखल्या जाणा-या इमारतीची पुनर्बांधणी योजना	रु. १२.८० लाख
ई] इ.क्र. २०-२२ मुझावर पाखाडी रोड, माझगांव विभाग भूकर पाहणी क्र. २०३ व २०४-ई विभाग येथील पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.	रु. २५.०० लाख [भूसंपादनासहीत]
उ] इ.क्र. ९ बी.डी.ई. उमरखाडी, "ब" विभाग मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या योजनेच्या अंदाजपत्रकास सुधारित आर्थिक मंजूरी देण्याबाबत.	रु. ५५.८० लाख [भूसंपादनासहीत]
ऊ] इ.क्र. २५-२५ अे बोरभाट लेन "डी" विभाग इमारतीच्या पुनर्बांधणीयोजनेस सुधारित प्रशासकिय मंजूरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.	रु. ३३.८६ लाख [भूसंपादनासहीत]

चर्चेच्या ओघा ओघात मुख्य अधिकारी/दुवपु यांनी उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांना अशा सूचना दिल्या की, काही दिवसापूर्वी पठ्ठे बापूराव मार्गावरील एका इमारतीस आग लागून त्यातील २१ रहिवाश्यांच्या घरांची छते जळून भस्मसात होऊन त्यात एक मुलगा निधन पावला. त्या इमारतीस त्यांनी स्वतः भेट दिली होती. तरी त्या इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक लवकरात लवकर तयार करुन बैठकीत सादर करावे.

पूर्तता उ. म. अ. [दक्षिण]

बाब क्रमांक : ३१.५

विषय :- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी देणेबाबत.

दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना तसेच सुधारित कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १९१ ते २७३ वर मंडळाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

तसेच उपमुख्य अभियन्ता [दक्षिण] यांनी मान. अध्यक्षांच्या परवानगीने इमारत क्र. १४५ जी, जे. एस्. एस्. रोड या इमारतीच्या दुरुस्ती कामाचा प्रस्ताव सर्व सन्मा. सदस्यांना मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

वरील सर्व प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होवून दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते प्रशासकिय मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३१/२२१.

दक्षिण मंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व अंदाजपत्रकांना सर्वानुमते सुधारित व प्रशासकिय मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ३१.६

विषय : उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी देणेबाबत.

उत्तर परिमंडळातील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय व सुधारित प्रशासकिय मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव पृष्ठ क्र. २७५ ते ३३१ वर सादर करण्यांत आलेले आहेत.

उपमुख्य अभियन्ता [उत्तर] यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने त्यांच्या विभागातील इ.क्र. १६ साई निवास गोखले रोड या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव सर्व सन्मा. सदस्यांना मंजूरीसाठी सादर केला.

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ३१/२२२

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या परिशिष्ट "ब" मधील सर्व अंदाजपत्रकांना सर्वानुमते सुधारित व प्रशासकिय मंजूरी देण्यांत आली.

मा. सभापती श्री. मनोहर कोकाटे यांनी मा. सदस्य श्री. हेमंत मंडलीक यांना मागील बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे त्यांनी केलेल्या पहाणी अहवालाबाबत माहिती देण्यास सांगितले. यावर बोलताना मा. सदस्य श्री. हेमंत मंडलीक यांनी सांगितले की, मागील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दिनांक १०. ३. ९५ रोजी झालेल्या ३० व्या बैठकीत बाब क्र. ३०. ३ अंतर्गत इमारत क्र. ३२१२ [१] झवेरी मेन्शन या नावाने ओळखल्या जाणा-या गिब्ज रोड "डी" विभाग येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित झवेरी मेन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ३७ ते ४३ वर सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा केल्यानंतर सविस्तर चर्चेअंती सदर इमारतीस मा. सदस्यांनी भेट देण्याचे सर्वानुमते ठरले. व त्यांच्या पाहणी अहवालानंतर सदर इमारतीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत येईल असे ठरले. तदअनुषंगाने त्यांनी दि. २४. ३. ९५ रोजी कार्यकारी अभियंता, सहकारी संस्था कक्ष यांचेसमवेत सदर इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. सदर पाहणीचेवेळी नियोजित संस्थेचे मुख्यप्रवर्तक व इतर काही भाडेकरु उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या निष्कर्षानुसार सदर नियोजित संस्थेचा स्वबळावर इमारत दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवण्याचा उद्देश समर्थनीय आहे.

मा. सदस्य श्री. हेमंत मंडलिक यांनी दिलेल्या निष्कर्षानुसार सर्वानुमते सदर इमारत त्या खालील भूखंडासहित नियोजित झवेरी मेन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३१/२२३

इमारत क्र. ३११२ [१] झवेरी मेन्शन या नावाने ओळखल्या जाणा-या, लिट्टील गिब्ज रोड "डी" विभाग येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित झवेरी मेन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक ३१.७

अध्यक्षांच्या परवानगीने ठेवावयाचे आयत्या वेळचे विषय.

१] विषय :- इमारत क्र. ९५ जी व ९५ के भुलाबाई देसाई रोड, [वॉर्डन रोड] येथील खटाव मेन्शन नावाने ओळखल्या जाणा-या इमारतीच्या दुरूस्तीबाबत.

उपरोक्त विषयाची सविस्तर बाब टिप्पणी मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली. सदर विषयाबाबत माहिती देताना मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, विषयांकित इमारतीची दुरूस्ती मंडळामार्फत चालू होती. परंतु सदर दुरूस्तीचे काम तेथील भाडेकरू/रहिवाश्यांच्या मर्जीप्रमाणे होत नसल्यामुळे भाडेकरूंनी सदर काम बंद पाडले. मंडळाला त्यांच्या इच्छेनुसार दुरूस्ती काम करणे शक्य होणार नाही, कारण मंडळास ठराविक विनिर्देशानुसारच काम करावे लागते. सदर दुरूस्ती काम गेले १ वर्षे बंद आहे. मंडळाच्या ठेकेदाराने मंजूर अंदाजपत्रकानुसार बहुतांशी काम केलेले आहे. सदर इमारतीतील भाडेकरूंचे एक शिष्टमंडळ मुख्य अधिकारी/दुवपु यांना भेटून विनंती केली की, ते त्यांच्या इमारतीचे उर्वरित दुरूस्तीचे काम स्वखर्चाने त्यांचे वास्तुशास्त्रज्ञ श्री. एस. आर. माहिमतुरा कन्सल्टंट यांच्या सल्ल्याने व मंडळाच्या पंजीकृत वास्तुशास्त्रज्ञ श्री. विनय आजगांवकर यांचे देखरेखीखाली त्यांच्या ठेकेदारामार्फत करू इच्छितात. तरी सदर कामास परवानगी देण्याची विनंती केली. याबाबतीत पूर्वी अशाच एका इमारतीतील भाडेकरूंना त्यांची इमारत मंडळाकडून १/- रूपये नाममात्र खर्च घेऊन स्वखर्चाने दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्याच धर्तीवर या इमारतीस परवानगी देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

वरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन भाडेकरूंच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तींना आधीन राहून परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले.

१] भाडेकरू/रहिवाशी इमारतीच्या संपूर्ण दुरुस्तीचे काम स्वखर्चाने मंडळातर्फे करतील व त्यापोटी मंडळातर्फे फक्त रु. १/- नाममात्र रक्कम देण्यात येईल.

२] रहिवाशांनी केलेल्या विनंतीनुसार ह्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम त्यांनी नेमलेल्या पंजिकृत ठेकेदारामार्फत श्री. एस्. आर. माहिमतूरा कन्सल्टन्ट यांच्या सल्ल्याने व वास्तुशास्त्रज्ञ श्री. विनय आजगावकर यांच्याकडून मंडळातर्फे करतील. व त्यापोटी होणारा संपूर्ण खर्च भाडेकरू/रहिवाशी, वास्तुशास्त्रज्ञ व ठेकेदार ह्यांना परस्पर अदा करतील. मात्र मंडळाचा यामध्ये काहीही हस्तक्षेप राहणार नाही.

३] रहिवाशी/भाडेकरु व वास्तुशास्त्रज्ञ व ठेकेदार हे सदर इमारतीच्या संपुर्ण दुरुस्तीकरिता जबाबदार राहतील. दुरुस्तीच्या वेळी काही अपघात किंवा हानी झाल्यास रहिवाशी/भाडेकरु व वास्तुशास्त्रज्ञ स्वत: संपूर्ण जबाबदार राहतील. त्यास मंडळाचे अभियंते तसेच इतर संबंधित अधिकारी जबाबदार राहणार नाही.

४] इमारतीच्या दुरुस्तीच्या वेळी काही अपघात, मृत जखमी आणि मालमत्तेचे नुकसान झाल्यास, त्याच्या भरपाईची संपूर्ण जबाबदारी रहिवाशी/भाडेकरूंवर राहील.

५] इमारत दुरुस्तीचे काम काही कारणास्तव पूर्ण न झाल्यास मंडळाची काहीही जबाबदारी राहणार नाही.

६] इमारतीच्या दुरुस्तीचे वेळी, इमारतीच्या कामाचा दर्जा, परिमाण इत्यादींच्या अचूकपणाची जबाबदारी भाडेकरू/रहिवाशांवर राहील.
मंडळातर्फे होणाऱ्या सदर इमारतीच्या दुरुस्तीचा खर्च व कामाबाबतचे काहीही करार मंडळ व इमारतीच्या भाडेकरू/रहिवाशी सोबत होणार नाही. परंतु दुरुस्ती खर्चापोटी मंडळाकडून रु. १/- नाममात्र देण्यात येईल.

वरील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती इमारतीतील सर्व भाडेकरू/रहिवाशांना बंधनकारक राहील व तसे हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल.

कृ.पु.प. २६/-

ठराव क्रमांक : ३१/२२४.

इमारत क्र. ९५ जी व ९५ के, भुलाभाई देसाई रोड [वार्डन रोड] येथील "खटाव मॅन्शन" नावाने ओळखल्या जाणा-या इमारतीच्या उर्वरित दुरुस्ती कामास भाडेकरुंना स्वखर्चाने वरील १ ते ६ अटीच्या अधिन राहून दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

विषय : इ.क्र. १५-१७ कामाठी पुरा, ५वी गल्ली येथील पाडलेल्या इमारतीतील भाडेकरुंना बृहतसूचीवर घेण्याबाबत.

वरील विषयाची बाब टिप्पणी मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांना सादर करण्यांत आली. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मु.अ./दु.व पु. यांनी सांगितले.

२] मा. सदस्य श्री. रौफ पटेल यांनी त्यांचे दि. १६.१२.९४ च्या पत्रान्वये विषयांकित इमारत २० वर्षापुर्वी कोसळली असून त्या इमारतीत रहाणारे कुटुंब प्रामुख्याने अल्प संख्यिक आहेत. व त्यांना सायन संक्रमण शिबिरात हलविण्यांत आले होते. परंतु जानेवारी १९९३ मध्ये मुंबई शहरात झालेल्या दंगलीत त्यांना हानी पोहोचली होती म्हणून त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना ओशिवरा येथील मंडळाच्या संक्रमण शिबिरात ठेवण्यात आले आहे. त्यांची एकूण संख्या २६ आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, सदर इमारत महापालिकेने सन १९७९ मध्ये तोडली होती. सद्य:स्थितीमध्ये सदर इमारत लोखंडी खांब व तुळया मध्ये अनधिकृतपणे तळ + ५ मजल्याची बांधण्यांत आली आहे. सदर बाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांनी महापालिकेकडे तक्रार केली आहे. याबाबत त्यांनी अशी विनंती केली आहे की, पूर्वी "अ" विभागातील अशाच एका इमारतीचे अनधिकृतपणे बांधकाम करुन ती इमारत विकण्यांत आली. त्यामुळे तेथील जुन्या भाडेकरुंना संक्रमण शिबिरात रहावे लागले. नजीकच्या भविष्य काळात सदर इमारत दुरुस्ती मंडळामार्फत पुनर्रचित करणे शक्य नसल्यामुळे त्यावेळच्या मंडळाने सदर इमारतीतील संक्रमण शिबिरात जुन्या भाडेकरुंना त्यांची इमारत कोसळली त्या वर्षाच्या प्राधान्याने बृहतसूची यादीमध्ये त्यांना सामाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. त्याच धर्तीवर विषयांकित इमारतीतील भाडेकरुंना बृहतसूचीत घेण्याची त्यांनी मंडळास विनंती केली आहे.

कृ.पु.प. २७/-

यावर बोलतांना मा. सभापतींनी सांगितले की, अशाप्रकारच्या मोकळ्या भूखंडावर अनधिकृतपणे बांधकाम केलेले निदर्शनास आल्यास संबंधितांवर योग्य ती कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी. पुढे त्यांनी असेही सांगितले की, विषयांकित इमारतीतील भाडेकरूंचा काही दोष नसल्यामुळे त्यांना बृहतसूचीवर घेणे उचित होईल. तसेच त्यांची इमारत ज्या वर्षी तोडण्यांत आली त्या वर्षाच्या प्राधान्याने त्यांना बृहतसुचीमध्ये समाविष्ट करण्यांत यावे असे सुचित केले. सविस्तर चर्चेअंती मा. सभापतींनी दिलेल्या सुचनेस सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३१/२२५

इ. क्र. १५-१७ कामाठीपुरा, ५वी गल्ली येथील जुने भाडेकरू जे सध्या दुरूस्ती मंडळाच्या संक्रमण शिबिरात वास्तव्य करून रहात आहेत, त्यांची इमारत अनधिकृतपणे बांधण्यात आल्यामुळे नजीकच्या भविष्य काळात दुरूस्ती मंडळाच्यामार्फत त्या भूखंडावर नवीन इमारत बांधली जाऊ शकणार नाही. त्यामुळे तेथील जुन्या भाडेकरूंना त्यांची इमारत ज्या वर्षी तोडली त्या वर्षाच्या प्राधान्याने बृहतसुचीवर घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

तदनंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. सभापती/दु. व पु. यांनी पुढील बैठक दि. ५. ५. ९५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्याचे सर्वानुमते ठरवून सभा समाप्त झाल्याचे जाहिर केले.

सही/-
निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु.

सही/-
मुख्य अधिकारी/दुवपु.

सही/-
मा. सभापती/दुवपु.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. ५.४.९५ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

[दक्षिण परिमंडळ] परिशिष्ट "अ"

अ.क्र.	विभाग	इमारतीचा तपशिल	दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/ नाहप्	मजल्यांची संख्या. / रहिवाशांची संख्या नि+ अनि= एकूण	बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर प्रती चौ. मी.	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम	रु. ७५०/- प्रति चौ. मी. दराप्रमाणे येणारी अंदाजपत्रकाची रक्कम
१	२	३	४	५	६	७	८
१	सी १-२	११० भंडारी स्ट्रीट, मुंबई	तिसरा / मंडळ	तउ+-२+-३[अंशत:] / १२+-४=१६	३७३.१६ / ७६९.५१	२८७१५२ / १६२३१६/-	१५५०३४/-
२	-"-	२३, अली उमर स्ट्रीट मरवॉ मरवॉडिया बिल्डींग	तिसरा / मंडळ	तळ+-४ / ४३+-१=४४	९०४.४० / ६८४.४१	६१८९८८/- / ३६२०५१/-	३६२०५१/-
३	डि-१	५१ उत्तर गल्ली रोड	पहिला / मंडळ	तळ+-३+-४ [अंशत:] / ४+-१=५	२६८.९२ / ६३०.०९	१६९४४३/- / १६९४४३/-	१६९४४३/-
४	सी-१-२	१४४-१४८ डॉ. आत्माराम मार्ग	पहिला / मंडळ	तळ+-२ / १७+-५=२२	४७१.०० / १०५७.०२	४९७८६०/- / ४९७८६०/-	३५३२५०/-
५	ए	३००-३०८ पेरिन नरिमन स्ट्रीट [हनुमान बिल्डींग]	चौथा / मंडळ	तळ+-२ / ४०+-२१=६१	५२८८.६८ / ४७१.९०	२४९५७७८/- / १२०६८५२/-	१२०६८५२/-
६	डी-१	४ आय, राघववाडी, जे. आर. रांगणेकर स्ट्रीट	चौथा / मंडळ	तळ+-२ / १८+-४=२२	१०८३.९५ / ७३४.०२	७९५६५६/- / २९२८३५/-	२९२८३५/-

७	सी-३-४	२१६ -२२०, डॉ. विगास स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ+-२ ३+-३=६	१८४.३७ ५१५.९०	१०१८६१.०० ९८४५७/-	९८,४५७/-
८	बी	१६ केशवजी नाईक रोड	तिसरा मंडळ	तळ+-३+-४ -[अशत:] ११+-४=१५	४७०.०० ५९१.७०	२७८११००/- १३२१५५/-	१३२१५५/-
९	सी-३-४	२८० लोकमान्य टिळक रोड	चौथा मंडळ	तळ+-५ २४+-७६=१००	३७५६.६१ ६४७.७५	२४,२९,५०७/- ५८७५८२/-	५९७५८२/-
१०	-"-	१२६ -ए, केव्हल स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ+-१ ७+-१=८	४१७.२० ६३६.४७	३१६४५६/- ३१६४५६/-	३१६४५६/-
११	-"-	१७८ ए बी, केव्हल क्रॉस लेन, नं. ७	दुसरा मंडळ	तळ+-४ २१+-९=३०	१०८२.९७ ५२६.९४	५७०६६४/- ३७४४५८/-	३७४४५८/-
१२	सी-१-२	१४० बापू खोटे स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ+-२ ३+-२=५	३१४.६४ ७३९.४१	२३२६४८/- २३२६४८/-	२३२६४८/-
१३	सी-२-४	४०७-४०९ जे. एस. एस. रोड	तिसरा मंडळ	तळ+-४ २०+-८=२८	९०६.९१ ७४१.०९	६७२१०८/- २८७६११/-	२८७६११/-
१४	डी-१	१६५-१६७ राजाराम मोहन रॉय	दुसरा मंडळ	तळ+-३ २३+-७=३०	७२४.०८ ६०९.००	४४०९७२/- ३५७५२२/-	३५७५२२/-

३९.९

६

१५	डी–१	३२७ एस. व्ही. पी. रोड मजरिया हाऊस	तिसरा मंडळ	तळ+–५ १४+–१०=२४	१८८३.५३ ३२४.८१	६११७९२/– २३५०८६/–	२३५०८६/–
१६	डी–१	३२, औताची वाडी	दुसरा मंडळ	तळ+–१ ३+–०=३	२८८.४० ५१७.०६	१४९१३१/– १११२८५/–	१११२८५/–
१७	बी	७३–७५, कांबेकर स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ+–४ ४१+–६=४७	१५२०.२७ ६७०.१७	१०,०१,८४५८ ६७७४९ ५/–	६७७४९५/–
१८	सी–३–४	१११–११५, दादी शेठ अग्यारी लेन	दुसरा मंडळ	तळ+–४ १७+–२४=४१	१३४०.०० ५१८.१२	६९४२८६/– ६७९२३६/–	६७९२३६/–
१९		सुधारित अंदाजपत्रके					
१९	सी–३–४	६–६ ए, वेलिंग्टन स्ट्रीट	दुसरा[सु] मंडळ	तळ+–४ ३७+–०=३७	१३५५.५७ ७३४.४९	९९५६५०/– ९४७७६७/–	३२१८९३/–
२०	सी–१–२	९२–९६ पारलोडिया स्ट्रीट	तिसरा[सु] मंडळ	तळ+–५ ११+–७=१८	८६०.१६ १४८६.७५	१२७८८५०/– ११६३९०९/–	१८०५२/–
२१	सी–३–४	११०–११८, पहिली मरिन स्ट्रीट	तिसरा[सु] मंडळ	तळ+–५ २०+–८=२८	३९५६.०० ७५३.८३	२९८२१८७/– २०७६९२८/–	११७३२२२/–

२२	–"–	१८ गझदर स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ+–४ ८+–१=९	७०४.७५ ७२४.२१	५१०३८७/– ५१०३८७/–	३४२६११/–
२३	डी–१	२२–२४ सदाशिव लेन [११६–१२६ बाडीलकर रोड] ना [illegible] प्रमाणपत्र अंदाजपत्रके.	दुसरा मंडळ	तळ+–३ २७+–१०=३७	१६४८.०० ७४१.९८	१२२२७१२/– ९२३४९२/–	३२९०५१/–
२४	सी–१–२	१३ पारुख स्ट्रीट लाकडीवाला बिल्डींग	दुसरा ना.ह.प्र.	तळ+–१ ८+–१=९	१०३७.७७ २४५.९८	२५५२७२/– २०२७४६/–	१३१९५१/–
२५	डी–२७	७ क्रॉफर्ड रोड, २ री क्रॉस लेन	चौथा ना.ह.प्र.	तळ+–३ १६+–०=१६	२२३.७० ८०१.२०	१७९२२९/– ४३८९०/–	३२,४३६/–
२६	बी	२४८ नागदेवी स्ट्रीट	पहिला ना.हप्र.	तळ+–२+–३ अंशत: ४ + ३=७	२८०.८९ ८२९.६३	२३२५३८/– २३२५३८/–	२१०२१८/–
२७	डी–१	५६ गांवदेवी मंत्री बिल्डींग	दुसरा ना.ह.प्र.	तळ+–३ १५+–०=१५	१२६३.७० ६९८.०७	८८१७६२/– ३११६०३/–	३११६०३/–
२८	बी	११३ नारंग स्ट्रीट	पहिला ना.ह.प्र.	तळ+–३+–४	४३२.४४ ११४७.३२	४९६१५०/– ४९६१५०/–	३२४३३०/–
२९	सी–३–४	१४५ जो.के.एस.एस. रोड	तिसरा मंडळ	तळ+–२ २२+–०=२२	५९७.५० ७०९.०८	४२३६८१/– २४९४६८/–	४४८१२५/–

143.46
(28.8)

दि. ५.४.९५ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या
३१ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेली अंदाजपत्रकाची यादी [उत्तर परिमंडळ]

परिशिष्ट "ब"

अ.क्र.	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा मंडळ/म्हाडा	मजले भाडेकरु निअनि. =एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. दर-चौ.मी. खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम. / निव्वळ टप्प्याची रक्कम.	शेरा.
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१.	ई-१	अ	इ.क्र. १९-ए, पंचकलशीवाडी आर.बी. मार्ग.	दु. टप्पा मंडळ	तळ+१ १२+०=१२	२३९.९६ रु६८३.३५	रु. १,६३,९७७.०० / रु. १,३१,६३०.००	
२.	ई-२	अ	इ.क्र. १६३ संत सावतामाळी भुवन, डॉ. बी.ए. रोड, भायखळा.	ति. टप्पा मंडळ	तळ+३ ३४+७=४१	१४४२.३० रु२६४.९५	रु. ३,८२,१३७.०० / रु. २,२०,२११.००	
३.	ई-१	अ	इ.क्र. ७धेलाबाई तिसरी गल्ली.	ति. टप्पा मंडळ	तळ+९ ४६+४=५०	९९०.६४ रु. ७११.५५	रु. ७,०४,८८५.०० / रु. २,७०,४२७.००	
४.	ई-१	अ	इ.क्र. १४-ए, आझाद बिल्डींग ३ क्रॉस रोड, आग्रीपाडा, भायखळा	प. टप्पा मंडळ	तळ+२ १०+०=१०	६६४.०० रु७१५.४७	रु. ४,७५,०७६.०० / रु. ४,७५,०७६.००	
५.	ई-२	अ	इ.क्र. कामाठीपुरा ४थी गल्ली	प. टप्पा मंडळ	तळ+३ ६+२=८	१२४.१६ ७४९.२५	रु. ९३,०२७.०० / रु. ९३,०२७.००	

२/—

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.
६.	फ–ग[द]		इ.क्र. ३८–ए, सरस्वती सदन, एलफिस्टन रोड.	ब–टप्पा मंडळ	तळ+१ / २०+०=२०	७५५. ३१ / रु. ३२६. १२	रु. २, ४६, ३१९. ०० / रु. २, ४६, ३१९. ००
७.	फ–ग[ड]	अ–क	इ.क्र. ३०९–ए, न्यु. पंडीत हाऊस एन.के. जोशी मार्ग, दादर [प] कासेल अली मंझील,	प. टप्पा मंडळ	तळ+३ / ८+०=८	३६४. ०४ / रु२६३. ०५	रु. ९५, ७६१. ०० / रु. ९५, ७६१. ००
८.	ई–२	अ	इ.क्र. ६–बी, एन. एम. जोशी मार्ग, भायखळा.	प. टप्पा मंडळ	तळ+३ / ३७+९=४६	१८७२. ०० / रु३३९. ४१	रु. ६, ३२, ५३२. ०० / रु. ६, ३२, ५३२. ००
				:– सुधारीत अंदाजपत्रके :–			
९.	फग [उ]		इ.क्र. ८ दामले निवास राम मारुती रोड, दादर [पश्चिम]	दु. टप्पा सुधा. मंडळ.	तळ+३ / ४०+२=४२	१८१५–७६ / ६२५=५४	रु. ११, ८४, ८५६=०० / रु. १०, १६, ८१६=००

३१.२५
२१.५४

६५६

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१०.	ई-१	अ	इ.क्र. २०५ तांबावाला बिल्डींग, डी. एल. मार्ग	दु. टप्पा सुधार मंडळ	तळ+३ अधिक४[भाग] मंडळ.	२८४२.३० / ४४१.६७	रु. १२,५५,३७६.०० / रु. ९,५४,४५७.००	
११.	ई-१	अ	इ.क्र. १३ पथ्थरवाला चाळ ५वी क्रॉस लेन सारवळी स्ट्रीट मदनपुरा.	दु. टप्पा मंडळ	तळ+३ / २०+१-२१	७४१.५० / रु. ७४८.४४	रु. ५,५४,९७०.०० / रु. ४,०६,८२५.००	
१२.	ई-२	अ	इ.क्र. १३७-अ, मोतिवाणी चाळ साने गुरुजी मार्ग, चिंचपोकळी	चौ. टप्पा सुधार मंडळ	तळ +२ / १३७+८=१४५	२३६०.३३ / रु. ४४७.७९	रु. १७,६५,०५२.०० / रु. ६,९८,९७५.००	
१३.	ई-२	अ	इ.क्र. २४१-सी, व्हिक्टोरिया मेन्शन, एन.ए. रोड.	चौ. टप्पा सुधार मंडळ	तळ+३ / ११+३=१४	१०१६.६६ / रु७१२.७८	रु. ७,१५,३६२.०० / रु. ५,३९,१८९.३६	
१४.	फ-ग[द]अ		इ.क्र. २८६ बचाल मेन्शन फर्ग्युसन रोड, प्रभादेवी	ति. टप्पा सुधार मंडळ	तळ+२ / ३४+५=३९	८०७.६० / रु८७९.९६	रु. ७,१०,६५५.०० / रु. ४,९५,५८६.००	
१५.	फग-[उ]	अ	१६, साई निवास, गोखले रोड, दादर [पश्चिम]	दु. टप्पा मंडळ	तळ+३ / १७+०=७०	११४१.८५ / ५२०.४९	रु. ५,७५,३२३.०० / रु. ५,७६,०७३.००	

A+B = 338.23 / 19733

9477 / 68.46